प्रेसनोट दिनांक– १७/०३/२०२२

लोकसेवक श्री. संजय पंढरीनाथ भंडारे, मंडळ अधिकारी (वर्ग–३), नेमणुक–मंडळ अधिकारी कार्यालय, तलासरी, ता.तलासरी, जिल्हा पालघर यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) यांनी घेतले ताब्यात.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) |
| २ | पोलीस ठाणे | तलासरी पोलीस ठाणे जि.पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री. संजय पंढरीनाथ भंडारे, वय–४६ वर्षे, मंडळ अधिकारी (वर्ग–३), नेमणुक–मंडळ अधिकारी कार्यालय, तलासरी, ता. तलासरी, जिल्हा पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | १५,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे आईचे नावे वडीलोपार्जीत जमिन असुन तक्रारदार याची मावशी व मामा हे मयत झाले असल्याने त्यांचे वारस नोंद करण्यासाठी व सदर जमिनीवरील बँक कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी तक्रारदार यांचे मामा यांनी अर्ज केला होता. तक्रारदार यांनी तलाठी कार्यालय तलासरी येथे सदर कामाची विचारपूस केली व लोकसेवक श्री. संजय पंढरीनाथ भंडारे, मंडळ अधिकारी, तलासरी यांना भेटले असता सदर कामाचे वारस नोंद केलेचा मोबदला म्हणुन व जमिनीवरील बँक कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी लोकसेवक श्री. भंडारे यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/– रूपये लाचेची मागणी केली. तसेच तक्रारदार यांना फोन करून लाचेची रक्कम देणेसाठी तगादा लावला होता. तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक १७/०३/२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) कार्यालयात तक्रार दिली आहे.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १७/०३/२०२२ रोजी आरोपी लोकसेवक यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामाचे अनुषंगाने १५,०००/–रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम लागलीच दिनांक १७/०३/२०२२ रोजी १३:०८ वाजताचे सुमारास मंडळ अधिकारी कार्यालय तलासरी, ता. तलासरी जिल्हा पालघर येथे तक्रारदार यांचेकडून लोकसेवक यांनी स्विकारली असता नमूद आरोपीत लोकसेवक श्री. संजय पंढरीनाथ भंडारे, यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, (कॅम्प पालघर) सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) पालघर प. ४०१४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810

(स्वपन विश्वास)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे (कॅम्प पालघर)